३.०० २८-४-२०२२ आ.प्र.

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २८/०४/२०२२

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

महानगरपालिकेत आपत्कालीन व्यवस्थापन व मान्सूनपूर्व आढावा बैठकी बाबत.

आयुक्त तथा प्रशासक डॉ. राजा दयानिधी (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली उल्हासनगर महानगरपालिकेत मान्सुन पूर्व कामांचा आढावा व आपत्कालीन परिस्थतीत करावयाचे नियोजन यासाठी सर्व संबंधित विभाग प्रमुख व इतर शासकीय कार्यालये यांची आढावा बैठक दि.२७ एप्रिल, २०२२ रोजी सकाळी १०:३० वा. आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस महावितरण, स्थानिक महसूल विभागाचे प्रतिनिधी, सहायक पोलीस आयुक्त, मध्य रेल्वेचे अधिकारी व अतिरिक्त आयुक्त, श्रीमती. करूणा जुईकर (सेवा), अतिरिक्त आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर (शहर) व महापालिकेचे सर्व उपायुक्त, सर्व विभाग प्रमुख व सहायक आयुक्त उपस्थित होते.

आपत्ती व्यवस्थापन विभागाचे प्रमुख, श्री. बाळू नेटके यांनी विभागाच्या पूर्व तयारीबाबत सभागृहाला अवगत केले. इतर शासकीय कार्यालये यांनी समन्वये ठेवण्यासाठी आवश्यक माहिती आदानप्रदान करण्यातबाबत सांगितले. महावितरण व रेल्वे प्रशासन यांच्या समस्या व पावसाळ्यापुर्वी करावयाची कामे याबाबत आयुक्त तथा प्रशासक यांनी संबंधितांना तात्काळ काम सुरू करण्यास सागितले.

आयुक्त तथा प्रशासक यांनी वार्षिक नालेसफाई, रस्त्यावर पडणारे खड्डे बुजविणे, पाणीपुरवठा, धोकादायक इमारतींवर कारवाई करणे व अतिधोकादायक इमारत निष्कासन, नागरिकांच्या आपत्कालीन परिस्थितीत निवा-याची सोय, अग्निशमन दल व आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या सुसज्जतेबद्दल सर्वांना निर्देश दिले. शहरात यापुर्वी घडलेल्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीच्या घटना व तत्कालीन उपाययोजना आणि भविष्यात तशाच घटना घडल्यास सुसज्ज राहणेबाबत सर्व विभागांना निर्देश दिले. तसेच आपत्ती व्यवस्थापन आराखडा ७ दिवसांत अद्ययावत करण्याचे आदेश विभागास दिले. पुढील बैठक ६ मे रोजी आयोजित करण्यात येणार असल्याचे प्रशासक तथा आयुक्तांनी सदर सभेत सांगितले.

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका

२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका